Estd: 1962

NAAC "A++" Grade

:: प रि प त्र क ::

संदर्भ : १. शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/६११ दि. १३.०९.२०२१.
२. बीएस्सी/एमएस्सी परीक्षा विभाग/१३२ दि. २७.०९.२०२१

उपरोक्त संदर्भ क्र. १ परीक्षक नियुक्ती विभागाकडील परिपत्रकाच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मधील एमफिल/प्री-पीएचडी कोर्सवर्क थेअरी परीक्षा मार्च/मे २०२१ चे कार्यवलन/संचलन/पर्यवेक्षण इत्यादी व परीक्षेच्या अनुषंगाने करावयाची संपूर्ण कार्यवाही महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर करण्याबाबत अवगत करण्यात आले आहे.

तथापि, अधिविभागाकडून सादर करण्यात येत असलेल्या अर्जावरून असे निदर्शनास येत आहे की, डिपार्टमेंट लॉगिनमधून काही अधिविभागांनी विद्यार्थ्यांचे फोटो व स्वाक्षरी अपलोड केलेली नाही. तसेच काही अधिविभागांकडून प्राप्त झालेल्या ऑनलाईन परीक्षा अर्जांच्या हार्डकॉपीवर अधिविभागप्रमुखांची स्वाक्षरी झाली नसल्याचे दिसून येते.

तरी आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, आपल्या अधिविभागामधील/केंद्रामधील परीक्षा अर्ज सादर करतेसमयी संबंधित विद्यार्थ्यांचे फोटो (आकार १० केबीपर्यंत) व स्वाक्षरी (आकार १० केबीपर्यंत) विद्यापीठ संकेतस्थळावरील www.unishivaji.ac.in/online_portal/ M.Phil.-PrePh.D. Student Photo & Sign Upload (Engg/Pharmacy Only) या संकेतपत्त्यावर अपलोड करावेत व नंतर सदरचे अर्ज हार्डकॉपीमध्ये परीक्षा विभागास दि. ०१.१०.२०२१ सादर करावेत. याबाबत कोणतीही मुदतवाढ देता येणार नाही यांची गांभीर्याने दखल घेऊन विहीत कार्यवाही करण्यात यावी.

या संदर्भात काही अडचण भासल्यास अथवा अधिकची माहिती आवश्यक असल्यास ०२३१-२६०९३३५/९११८ या क्रमांकावर संपर्क साधण्यात यावा.

प्र. संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

बीएस्सी/एमएस्सी परीक्षा विभाग/१३३
दि. २८.०९.२०२१